उपवनसंरक्षक, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा येथील बुलढाणा वनविभागाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वन विभाग,

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१०/वने-९

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २७ जुलै, २०२६

वाचा :-

१. वित्त विभाग,शासन निर्णय क्र.विअप-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दिनांक २०.९.२०१९
२. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दिनांक २५.९.२०१९
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२४/लेखा/प्रक्र.२६/६०१/२०२५-२६, दिनांक १०.१२.२०२६

<u>प्रस्तावना</u>:-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वाचा क्र.३ येथील पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती यांनी उपवनसंरक्षक, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा येथील बुलढाणा वनविभागाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतच्या रु.२१३०.०७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

सदर मुळ अंदाजपत्रकास वाचा येथील क्र.२ च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी तांत्रिक सहमती (Technical Approval) दिलेली आहे.

वित्त विभागाच्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या वाचा येथील क्र.१ चा शासन निर्णय दिनांक २०.९.२०१९ मधील भाग एक उपविभाग-५ परि.क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाचा क्र.२ येथील दिनांक २५.९.२०१९ च्या परिपत्रकान्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना संबधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी तांत्रिक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधीत उपभोक्ता विभागास देण्यात आलेले आहेत. तसेच सदर परिपत्रकान्वये रु.१५.०० कोटीपेक्षा जास्त किंमत असलेल्या अंदाजपत्रकांना मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीमध्ये छानणी केल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधीत उपभोक्ता विभागास देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक सहमती करिता सादर करण्यात आला होता.

त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने उपवनसंरक्षक, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा येथील बुलढाणा वनविभागाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे या कामाच्या रु.१०८२.०० लक्ष इतक्या

रकमेच्या अंदाजपत्रकास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वाचा येथील नमूद क्र.३ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव, वित्त विभागाचा वाचा येथील नमूद क्र.१ चा शासन निर्णय व सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाचा येथील नमूद क्र.२ चे परिपत्रक आणि विभागास प्राप्त अधिकार विचारात घेता, उपवनसंरक्षक, बुलढाणा वनविभाग, बुलढाणा येथील बुलढाणा वनविभागाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे या कामाच्या रु.१०८२.०० लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** (Recapitulation Sheet) मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच खालील अटीच्या अधीन राहून (वित्तीय मान्यता वगळून) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी उपरोक्त नमूद अंदाजपत्रकातील कामे सुरु करण्यापूर्वी स्थापत्य व विद्युत विषयक कामांना वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २०.९.२०१९ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५.९.२०१९ मधील परिपत्रकातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता असल्याची खातरजमा करावी.

२. अंदाजपत्रक खाजगी वास्तुशास्त्रज्ञ यांनी तयार केलेल्या नकाशावर आधारीत असल्यास नकाशास मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांची सहमती/स्वाक्षांकन प्राप्त करुन घेण्यात यावी. अंदाजपत्रकातील विविध कक्षांचे क्षेत्रफळ विहित निकषांनुसार आहे किंवा कसे, याबाबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून खाजरजमा करण्यात यावी.

३. अंदाजपत्रक व नकाशे उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन घेण्यात यावे.

४. अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरवात करु नये.

५. नियोजित जागा विभागाच्या ताब्यात असल्याचे गृहीत धरुन प्रशासकीय मान्यता देण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांची राहील.

६. आवश्यक त्या प्रमाणपत्रांना नगरपालिका, तत्सम प्राधिकरणे इ. यांची मंजुरी आणि "ना हरकत" प्रमाणपत्रे बांधकाम सुरु करण्यापूर्वी प्राप्त करण्यात यावी.

७. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८. अंदाजपत्रकातील तरतूदी ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या असल्याने सदर तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तुत अंदाजपत्रक करुन त्यास सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता घेऊनच काम हाती घ्यावे.

९. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीजीडी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

१०. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिच्छेद २६२ अन्वये प्रशासकीय मान्यता निर्गमित झाल्यापासून सदर बांधकाम कोणत्याही कारणास्तव पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सुरु न झाल्यास सदर प्रशासकीय मान्यता अंमलात राहणार नाही.

११. प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा वापर करावा अथवा उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.२४.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये वस्तु व सेवा खरेदीकरीता केंद्र शासनाने विकसीत केलेल्या GeM पोर्टल कार्यपध्दीतचा अवलंब करणे शक्य आहे किंवा कसे याबाबींचा स्वतंत्ररित्या विचार करावा.

१२. स्थापत्य कामांच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

१३. विषयांकित कामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही यादृष्टीने दक्षता घेऊन काम करण्यात यावे. तसेच सदरची कामे प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या रक्कमेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी.

१४. प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्यास संबंधीत विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घ्यावी.

१५. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही, याची सुध्दा दक्षता घ्यावी.

१६. वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकातील अटी व वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१७. शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१८. कामांची अंमलबजावणी करताना कामांचे एकत्रीकरण करुन नियमानुसार ई-निविदा प्रणाली अवलंबण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.०८/इमा-३, दिनांक ११.०२.२०२६ नुसार व शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दिनांक २०.९.२०१९ अन्वये वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा या शासन निर्णयातील भाग एक उपविभाग-५ परि.क्र.१३४ (१), १३४ (२) आणि १३४ (३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दिनांक २५.९.२०१९ अन्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी तांत्रिक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे उपभोक्ता विभागास प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२७१७१७४६४६४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.27 17:19:04 +05'30'

(साहेबराव घिगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर

२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती
३. उप वनसंरक्षक, बुलढाणा वन विभाग, बुलढाणा
४. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता (महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर
५. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई
७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई
८. कार्यासन वने-२/ब-१, वन विभाग व महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यासन वने-९, वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

प्रपत्र-अ

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१०/वने-९, दिनांक २७ जुलै,२०२६ सोबतचे प्रपत्र अ

Name of Work: - Construction of Divisional Office of Dy. Conservator of Forest at Auldhana Tq.Dist. Buldhana						
Executive Agency- Public Works Department						
Land Avaibility-Yes						
Architect-Goverment architect						
RECAPITULATION SHEET						
Sr No	**Prticular of Scope**		**Unit Rate Norms Rs. per (Sq.M./Metre/ Lumpsump etc.)**		**Cost Rs. in lakhs**	
					Component Wise	**Total**
A)	**Essential Items (Components)**					
1	**Building proper (Built Up Area &Sq.m)**					
	Stilt Floor	380.45	Sq.M	28,000	107	
	1st Floor	877.09	Sq.M	28,000	246	
	2st Floor	758.10	Sq.M	28,000	212	
	Total B.U.A.=	2015.64	Sq.M		**Sub Total (1)**	564
2	Electrification	Internal		5% of (a)	28	
		External		6% of (a)	34	
	Fire Fighting arrangements etc.			@400/Sq.mt.	8	
	AC			L.S	15	
	Lift	1		L.S	20	
	Pump House & Borewell			L.S	6	
	Area Lighting, CCTV, Generator etc			L.S	17	
					Sub Total (2)	128
3	Water Supply and Sanitary Works		5% of (a)		**Sub Total (3)**	28
4	Furniture	1,144.63	Sq.M	5000	**Sub Total (4)**	57
					Sub Total (A)	778
(B)	**MISSELLANEOUS ITEMS**					
	Compound Wall & Gate (Rmt.)	240	Rmt	8000	19	
	Water Main Storage	**70000**	Litres	46	32	
	Water Main Storage	**100000**	Litres	**23**	23	
	internal /approach Roads, Land Development, Parking,Land Scaping, Soil Investigation & Land Survey Etc		**L.S**		15	
					Sub Total (B)	**66**
	Project Cost (P) = (A)+ (B)					**844**
(C)	**PROVISIONS**					
	(i)Contingencies 4% on (Sub total A1)				**23**	
	(ii) GST 18% on (P)				**152**	
	(iii) Price Escalation 5% on (P)				**42**	
	(iv) Labour Insurance 1% on (P)				**8**	
	(iv) PMC Charges 1.5% on (P) with GST				**13**	
					Sub Total (C)	**238**
	Total Cost of Project (TPC)				**(A+B+C)**	**1,082**
	Say Rs. Lakhs				**1082.00**	

PLINTH AREA RATES FOR

1	**Bldg Civil (A1) =**	**Rs.**	**28000 /Sqm**
2	**Bldg Civil, Elect, Water Supply, Furniture (A) =**	**Rs.**	**38,576/Sqm**
3	**Total (A+B)**		**41,870/Sqm**

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.27 17:19:22 +05'30'

(साहेबराव घिगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन